# रेन वॉटर हार्वेस्टिंग(RWH)

रेनवॉटर हार्वेस्टिंग म्हणजे आपल्या छतावर आणि मोकळ्या मैदानांवर पडणारे पावसाचे पाणी नंतरच्या वापरासाठी गोळा करून साठवण्याची प्रक्रिया आहे. हे पाणी थेट वापरासाठी साठवले जाऊ शकते किंवा भूजल पुनर्भरण केले जाऊ शकते.



> **पावसाचे पाणी साठवा**
> जिथे पडेल, जेव्हा पडेल
> **शाश्वत पाणी पुरवठ्यासाठी!**



## कोठे स्थापित करू शकतो ?

रेनवॉटर हार्वेस्टिंग संरचना हे खालील पर्यायांपैकी कुठेही स्थापित केले जाऊ शकते'.



अंगणवाडी


शासकीय इमारत


शेत


सार्वजनिक ठिकाण


पूर क्षेत्र

**जमिनीवरील वाहून जाणाऱ्या पाण्यासाठी चेकडॅम्स,**
**तर छतांवरील पावसाच्या पाण्यासाठी रेन वॉटर हार्वेस्टिंग!**

## तुमच्या गावाचे "वॉटर चॅम्पियन" व्हा!

## रेनवॉटर हार्वेस्टिंग चे घटक आणि वैशिष्ठे

### ०.१ छतावरचा भाग

- RWH कोणत्याही प्रकारच्या छतावर केले जाऊ शकते.
- पावसाळ्यापूर्वी आणि दरम्यान छप्पर आणि फिल्टरची योग्य स्वच्छता करणे अनिवार्य आहे.
- छत स्वच्छ करण्यासाठी साबण किंवा एसिड वापरणे टाळा.
- छताची पृष्ठभाग गुळगुळीत, स्वच्छ करणे सोपे आणि टिकाऊ असावे, जेणेकरून कचरा पाण्यात जाणार नाही.


RCC छत


गॅल्वनाइज्ड लोखंडाचे छत



पन्हाळीदार पत्र्याचे छत




### ०४. साठवण टाकी

- साठवण टाक्यांचे झाकण/छत घट्ट बसवलेले असावे ~~बा~~,ज्यामुळे उजेड आत जाणार नाही पायथ्याशी फ्लशिंग पाईप आणि साफ करण्यासाठी झाकण असणे आवश्यक आहे.
- टाक्या फक्त पावसाच्या पाण्याने भराव्यात.
- टाक्या आतून स्वच्छ करणे सोपे असावे.


पॉलीथिलीन टाकी



दगडी टाकी


फेरोसीमेंट टाकी


सिमेंट चौरस टाकी

### ०२. पाणी वाहून नेण्याची प्रणाली व पन्हाळी

- पन्हाळीचा आकार सर्वात जास्त पावसाच्या वेळी होणाऱ्या प्रवाहाशी जुळणारा असावा, आणि शक्यतो 10-15% मोठा असावा.
- योग्य प्रवाहासाठी अर्धवर्तुळाकार किंवा आयताकृती गटर वापरा.
- पाणी भरल्यावर गटर कोसळू किंवा झुकू नयेत याची खात्री करण्यासाठी गटरला चांगला आधार द्या.


साधा गॅल्वनाइज्ड लोखंडी गटार


पीव्हीसी सामग्रीचा गटर


बांबू सुपारीच्या खोडापासून तयार केलेला गटर

### 03. फर्स्ट फ्लश प्रणालीआणि गाळणे

- नळ टाकीच्या तळापासून 10 सें.मी. वर बसवले पाहिजेत जेणेकरून कचरा खाली बसू शकेल आणि पाण्याची गुणवत्ता टिकून राहील.
- फर्स्ट फ्लश प्रणाली सुरुवातीचे दूषित-पाणी वळवते, आणि फिल्टर युनिट पाणी साठवण टाकीत जाण्यापूर्वी घाण आणि प्रदूषक काढून टाकते.


कापडाची गाळण


पॉप-अप गाळण


देवास गाळण


उलटा वाळू फिल्टर

## पावसाचे पाणी साठवण्यासाठी करावयाच्या गोष्टी

- सुरुवातीचे पावसाचे पाणी साठवण टाकीत जमा करण्यापूर्वी ते वळवून काढून टाका.
- छत दर १५ दिवसांनी स्वच्छ करा आणि त्यावर कोणतीही पाने नाहीत याची खात्री करा.
- पाईप्स योग्य स्थितीत आहेत याची खात्री करा.
- पावसाच्या पाण्याच्या टाकीच्या वर घट्ट झाकण लावा, जेणेकरून आत सूर्यप्रकाश जाऊ शकणार नाही, कारण त्यामुळे शेवाळ वाढू शकतात..

## पावसाचे पाणी साठवताना टाळावयाच्या गोष्टी

- पाण्याच्या टाकीत योग्य झाकणांशिवाय पावसाचे पाणी साठवू नका.
- छतावर रंग, रसायने किंवा धोकादायक पदार्थ वापरू नका.
- पहिल्या पावसाचे पाणी वेगळे करणारे वाल्व उघडे सोडू नका! ते बंद करण्याचे लक्षात ठेवा.


Implemented by:
CWAS CENTER FOR WATER AND SANITATION
CRDF CEPT UNIVERSITY

In partnership with:
HDFC BANK
PARIVARTAN
A step towards progress